# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 23/09/2021 (गुरूवार)

(दुपार)

---

दुखापत

1) पो.स्टे. बेला :– अंतर्गत 17 कि. मी अंतरावर मौजा सालेभट्टी येथे दरम्यान दि. 21/09/2021 चे 17.30 वा. फिर्यादी नामे– गजानन परसराम भुरे वय 35 वर्षे रा. सालेभट्टजी ता. उमरेड जि. नागपूर हा आपली गाय घेवून घराकडे येत असता आरोपी नामे– अमोल कवडू मसराम वय 32 वर्षे रा. सालेभट्टजी ता. उमरेड जि. नागपूर याने ''तुझी गाय माझ्या शेतात का आली'' या कारणावरून आरोपीने फिर्यादीस शिवीगाळ करून काठीने उजव्या घुटन्यावर मारून जखमी केले, तसेच मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. बेला येथे आरोपीविरुध्द कलम 326, 504, 506 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक कुणाल ठाकुर 9860661164 हे करीत आहे.

2) पो.स्टे. नरखेड :– अंतर्गत गोधनी नरखेड येथे दरम्यान दि. 21/09/2021 चे 17.00 वा. ते 17.30 वा. फिर्यादी नामे– कु. गीता रमेश धुर्वे, वय 20 वर्ष, रा. गोधनी नरखेड हि घरी हजर असतांना गावातील आरोपी नामे– सुदामन युवनाते, वय 40 वर्ष, रा. गोधनी, नरखेड हा दारू पेवुन घरासमोर आला व फिर्यादीला म्हणाला की, ''तुझा मोठा भाउ गणेश घरी आहे का''? त्याला फिर्यादीने भाउ घरी नाही आहे, तो चारा आणायला गेला आहे असे म्हटले असता तरी सुध्दा आरोपीने फिर्यादीस तुझ्या भावाला बोलाव असे म्हणुन शिवीगाळ करून बासाच्या काडीने पायाच्या मांडीवर मारले. त्यावेळी फिर्यादीची काकु सुशीला धुर्वे हिने आरोपीला हटकले असता पुन्हा त्याने शिवीगाळ करून मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. नरखेड येथे आरोपीविरुध्द कलम 324, 504 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक गजानन शेंडे मो. क्र. 8830107633 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर